**वसई-विरार शहर महानगरपालिका**

नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक 2026

प्रेसनोट-

ता.27.03.2026

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक 2026 करिता मतदान **रविवार दिनांक 29 मार्च 2026** रोजी सकाळी.7.30 ते सायंकाळी.5.00 वाजे पर्यंत होणार आहे. सदर निवडणुकीत खालीलप्रमाणे उमेदवारांमध्ये मतदान होणार आहे :

• सर्वसाधारण गट (पुरुष – एकूण जागा : 2) या गटाकरिता 11 उमेदवार + नोटा (NOTA) असे एकूण 12 पर्याय उपलब्ध असून, त्यापैकी आपल्या पसंतीचे कोणतेही दोन उमेदवार निवडावेत.

• सर्वसाधारण गट (महिला राखीव – एकूण जागा : 1) या गटाकरिता 3 उमेदवार + नोटा (NOTA) असे एकूण 4 पर्याय उपलब्ध असून, त्यापैकी आपल्या पसंतीचा कोणताही एक उमेदवार निवडावा.

• इतर मागास वर्ग (OBC – एकूण जागा : 1) या गटाकरिता 2 उमेदवार + नोटा (NOTA) असे एकूण 3 पर्याय उपलब्ध असून, त्यापैकी आपल्या पसंतीचा कोणताही एक उमेदवार निवडावा.

• वरीलप्रमाणे, प्रत्येक मतदारास एकूण चार मते देण्याचा अधिकार आहे.

या मतदान प्रक्रियेत **सर्वेक्षणाअंतर्गत अंतिम मतदार यादीत समाविष्ट असलेल्या फेरीवाला मतदारांनाच** मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

**मतदान केंद्रांची यादी पुढीलप्रमाणे आहे :**

- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए – विराट नगर, पुष्पा नगर,मनुबाई निदान केंद्र समोर,विरार पश्चिम
- प्रभाग समिती बी – निळेगाव रोड,नालासोपारा (पश्चिम )
- प्रभाग समिती सी –मच्छीमार्केट इमारत, विरार पूर्व,
- प्रभाग समिती डी – वेदांत टॉवर,आंबावाडी रोडी, तुळींज,नालासोपारा (पूर्व)
- प्रभाग समिती ई – वृंदावन गार्डन इमारत , नालासोपारा (पश्चिम)
- प्रभाग समिती एफ – पेल्हार कार्यालय, नालासोपारा (पूर्व)
- प्रभाग समिती जी – फादरवाडी कार्यालय,गोखिवरे रोड,वसई (पूर्व)
- प्रभाग समिती एच – नवघर माणिकपूर कार्यालय,एस.टी.डेपो जवळ,वसई रोड (पश्चिम)
- प्रभाग समिती आय – वसई गाव कार्यालय, (वसई पश्चिम)

मतदारांना आपले नाव तपासण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर **(vvcmc.in)** जाऊन "ताज्या घडामोडी" या विभागावर क्लिक करून उपलब्ध लिंकद्वारे नाव शोधता येईल.

**मतमोजणी प्रक्रिया** सोमवार दिनांक **30/03/2026** रोजी सकाळी **10.00 वाजता**, वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, यशवंत नगर, विरार पश्चिम येथील **दुसरा मजला** येथे पार पडणार आहे.

सर्व संबंधित फेरीवाला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, आवाहन वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

(निवडणूक निर्णय अधिकारी)

नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक 2026

वसई-विरार शहर महानगरपालिका